# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


प्रेस नोट क्र-४३३-२०२४ दिनांक-१४/११/२०२४

## प्रेस नोट

### “ चारचाकी वाहनाची काच फोडुन चोरी करणाऱ्या तिरची गँग (तमिळनाडू) मधील आरोपीतास अटक करुन चोरीस गेलेली मालमत्ता हस्तगत करण्यात नालासोपारा पोलीसांना यश.”

दिनांक १९/१०/२०२४ रोजी १२.१५ वा. फिर्यादी नामे श्री अमित विजय गडकरी, वय ५५ वर्ष, व्यवसाय - रबरचा स्वत:चा व्यवसाय, रा.ठि. जी/०१,लाभ कॉम्प्लेक्स, अंबाडी क्रॉस रोड, वसई पश्चिम, ता.वसई, जि.पालघर मो.नं. ९८२३०३७४४६,८९९९६१८०७७ हे त्यांचे टाटा सफारी या चारचाकी वाहन क्रमांक एम एच ४८ सी के ६४६४ ने दुपारी १२.१५ वाजताचे सुमारास वैयक्तीक कामाकरीता कोटक बँक नालासोपारा पश्चिम येथे आले होते. रस्त्याचे बाजुला वाहन पार्क करुन बँकमध्ये जाताना त्यांनी त्यांच्या वाहनामध्ये मागील सीटवर ०२ लॅपटॉप व २७,०००/- रुपये रोख रक्कम सॅक मध्ये ठेवून वाहनास लॉक केले होते. फिर्यादी काम संपल्यावर वाहनाजवळ आले असता त्यांना वाहनाचे ड्रायव्हर सिटच्या मागील बाजुची काच तुटलेली दिसली तसेच पाठीमागील शिटवर ठेवलेल्या सॅक दिसुन आल्या नाहीत. तेव्हा त्यांची खात्री झाली की, कोणीतरी अज्ञात चोरटयाने त्यांच्या वाहनाची काच फोडुन वाहनातील २ लॅपटॉप व २७,०००/- रोख रक्कम सॅकसह चोरी करुन घेवून गेले आहेत.म्हणुन त्यांनी दिलेल्या तक्रारीवरुन नालासोपारा पोलीस ठाणेस गु.र.क्र. ३६५/२०२४ भा.न्याय संहिता कलम ३०३(२), ३२४(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला होता.

नालासोपारा पोलीस स्टेशनच्या कार्यक्षेत्रामध्ये गेल्या काही दिवसांपासुन चोऱ्यांचे प्रमाण वाढल्याने परिस्थीतीचे गांभीर्य लक्षात घेवून वरिष्ठांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हयाचा तपास सुरु केला. घटनास्थळावरील प्राप्त सी.सी.टी.व्ही फुटेज पाहुन अनोळखी चोरटयांचा शोध सुरु केला. आरोपींचा शोध घेत असताना नालासोपारा, वसई, बोरीवली व मुंबई परिसरातील सुमारे २५० सी.सी.टी.व्ही फुटेज कॅमेरे पडताळण्यात आले. घटनास्थळावरिल पुरावे व तांत्रिक माहितीच्या आधारे गुन्हयाचा तपास केला असता गुन्हयातील आरोपी नामे शनमुगम अमरनाथन, वय ३८ वर्षे, रा. २९ मिल कॉलीनी, रामजी नगर, त्रिरुचीरापल्ली तामिळनाडु यास निषन्न करुन त्यास त्याचे राहते घरातून दिनांक ०९/११/२०२४ रोजी अटक करण्यात आली. अटक आरोपीताकडे अधिक तपास करता त्याने सदरचा गुन्हा केला असल्याची कबुली दिल्याने त्याचेकडुन गून्हयातील १) २०,०००/- रुपये किंमतीचा एच.पी. कंपनीचा १ लॅपटॉप व २) २७,०००/- रुपये रोख रक्कम असे एकूण ४७,०००/- रुपये माल हस्तगत करण्यात आला.

तसेच अटक आरोपीत याचेकडे सखोल चौकशी केली असता त्याने त्याचे साथीदारांसोबत मिळुन मुंबई, नवीमुंबई परिसरात ठिक-ठिकाणी चो-या केल्या असल्याची माहीती दिल्याने **आरोपीताकडुन उघडकीस आणलेल्या गुन्हयांची माहिती खालीलप्रमाणे.**

| अनु.क्र | पोलीस ठाणे , गुन्हा रजिस्टर क्रमांक व कलम |
|---|---|
| ०१ | शिवाजी पार्क पोलीस ठाणे,मुंबई गुन्हा रजि. नं. I २७८/२०२४ भा.न्या.संहिता.कलम ३०५(क), ३२४ (३), ३(५) अन्वये |
| ०२ | पार्कसाईट पोलीस ठाणे,विक्रोळी मुंबई गुन्हा रजि. नं. I ३५२/२०२४ भा.न्या.संहिता.कलम ३०५(क), ३२४(३),३(५) अन्वये |
| ०३ | पार्कसाईट पोलीस ठाणे, विक्रोळी मुंबई गुन्हा रजि. नं. I ३५३/२०२४ भा.न्या.संहिता.कलम ३०५(क), ३२४(३),३(५) अन्वये |
| ०४ | पनवेल शहर पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. I ६३०/२०२२ भा.न्या.संहिता कलम ३०५ अन्वये |
| ०५ | टिळकनगर पोलिस ठाणे, मुंबई गुन्हा रजि.नं.I ५१२/२०२४ भा.न्या.संहिता.कलम ३०३(२) ३२४(४), |
| ०६ | टिळकनगर पोलिस ठाणे, मुंबई गुन्हा रजि.नं.I ५३५/२०२४ भा.न्या.संहिता.कलम ३०३(२) ३२४(४), |

**अटक आरोपीत याचा गून्हेगारी पूर्वाभिलेख तपासला असता त्याचेवर यापुर्वी खालीलप्रमाणे गून्हे दाखल असल्याची माहिती प्राप्त झाली.**

| अनु.क्र | गुन्हा रजिस्टर क्रमांक व कलम |
|---|---|
| ०१ | हलासूरुगेट पोलिस ठाणे कर्नाटक गुन्हा रजि. नं. I १९०/२०१० भा.द.वि कलम १२० ब, ४२०,३४ |
| ०२ | हलासूरुगेट पोलिस ठाणे कर्नाटक गुन्हा रजि. नं. I १५/२०१२ भा.द.वि कलम १२० ब, ४२०,३४ |
| ०३ | हलासूरुगेट पोलिस ठाणे कर्नाटक गुन्हा रजि. नं. I ६९/२०१२ भा.द.वि कलम १२० ब, ३८०,४२०,३४ |
| ०४ | करिमनगर पोलिस ठाणे तेलंगाणा गुन्हा रजि. नं. I १३८/२०१२ भा.द.वि कलम ३७९ |
| ०५ | एस.जे.पार्क पोलिस ठाणे कर्नाटक गुन्हा रजि. नं. I २३५/२०००९ भा.द.वि कलम १२० ब, ३८०,४२०,३४ |
| ०६ | एस.जे.पार्क पोलिस ठाणे कर्नाटक गुन्हा रजि. नं. I १००/२०००९ भा.द.वि कलम १२० ब, ३८०,४२०,३४ |
| ०७ | एस.आर.पोलिस ठाणे तेलंगाणा गुन्हा रजि. नं. I १२४/२०११ भा.द.वि कलम ३७९,४११ |
| ०८ | एस.आर.पोलिस ठाणे तेलंगाणा गुन्हा रजि. नं. I १३१/२०११ भा.द.वि कलम ३७९,४११ |
| ०९ | एस.आर.पोलिस ठाणे तेलंगाणा गुन्हा रजि. नं. I ४८/२०११ भा.द.वि कलम ३७९,४११ |
| १० | अशोक नगर पोलिस ठाणे कर्नाटक गुन्हा रजि. नं. I १७/२०१३ भा.द.वि कलम ४२०,३८०,१५९ |
| ११ | अशोक नगर पोलिस ठाणे कर्नाटक गुन्हा रजि. नं. I ४८/२०११ भा.द.वि कलम ४२०,३८०,१५९ |
| १२ | अशोक नगर पोलिस ठाणे कर्नाटक गुन्हा रजि. नं. I ४८/२०११ भा.द.वि कलम ४२०,३८०,१५९ |
| १३ | कंटोमेंट क्राइम गुन्हा रजि. नं. I ११५३/२०११ भा.द.वि कलम ३७९ |

सदरची कामगिरी श्री. मधुकर पाण्डेय - पोलीस आयुक्त, श्री. दत्तात्रय शिंदे - अपर पोलीस आयुक्त, श्री. जयंत बजबळे - पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-०३ विरार, श्री. विजय लगारे - सहा. पो.आयुक्त नालासोपारा, श्री. विशाल वळवी - वरीष्ठ पोलीस निरीक्षक, नालासोपारा पोलीस ठाणे, श्री. धनंजय शिंदे - पोलीस निरीक्षक (गुन्हे), गुन्हे प्रगटीकरण शाखेचे सपोनि/राजेंद्र चंदनकर, पोउपनि/योगेश मोरे, सफौ/हिरालाल निकुंभ, पोहवा/प्रशांत साळुके, पोना/अमोल तटकरे, पोशि/कल्याण बाचकर, पोशि/राजेश नाटुलकर, पोशि/प्रेम घोडेराव व पोशि सोहेल शेख - पो.उ.आ.कार्यालय यांनी केलेली आहे.

**----0000----**